# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्र.मुमाआ/नों.क्र.८७ / २३ /अ.क्र.८८१९ /२५**
**क्र.मुमाआ/नों.क्र.८८ / २३ /अ.क्र.८८२०/२५**

श्री.जफर खान गफ्फार खान

विरुद्ध

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (ना. पु. ३१)**
अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मादाम कामा मार्ग
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई – ४०००३२.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अवर सचिव (ना. पु. ३१)**
अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मादाम कामा मार्ग
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई – ४०००३२.

**व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०३.१२.२०२५**

अपीलकर्ता : उपस्थित ऑनलाईन
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ०८.०६.२०२२ | -- | १४.०७.२०२२ | -- |

प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थी आज ऑनलाईन पध्दतीने उपस्थित असून प्राधिकरणाच्या वतीने अपिलार्थींनी दाखल केलेल्या दि.२२.०६.२०२२ रोजीचा अर्ज यात औरंगाबाद शहरातील स्वस्त धान्य दुकान क्र.१९१ ते १९९ विशेष बाब म्हणून मंजूर करण्यात आली होती त्या संदर्भातील माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी, औरंगाबाद यांच्या अखत्यारितील असल्याने **कलम ६ (३)** अन्वये उपरोक्त अर्ज सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी तथा जन माहिती अधिकारी, जिल्हा पुरवठा कार्यालय, औरंगाबाद यांना हस्तांतरण करण्यात आला असून यात अपिल अर्ज हे अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, औरंगाबाद यांच्याकडे दाखल करण्याविषयी सुस्पष्टपणे अपिलार्थींना सूचित करण्यात आले होते.

तथापि, अपिलार्थींनी त्यांचा प्रथम अपिल अर्ज हा अवर सचिव तथा अपिलीय अधिकारी, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग येथे दाखल केला असून त्यानंतर प्रस्तुत प्रकरणी दोन्ही प्रकरणात अपिलार्थींनी त्यांचा प्रथम अपिल अर्ज हा मंत्रालय येथील अवर सचिव यांच्याकडे दाखल केला असून **मूळ जोडपत्र अ** हा

देखिल जन माहिती अधिकारी, अन्न व नागरी पुरवठा विभाग यांचेकडे दाखल केला असून यातील उपलब्ध असलेली माहिती ही खरं तर जिल्हा पुरवठा अधिकारी स्तरावरच उपलब्ध असल्याची वस्तुस्थिती त्यांना जन माहिती अधिकारी स्तरावर त्यांना कळविण्यात आली असून प्रस्तुत प्रकरणी विद्यमान जिल्हा पुरवठा अधिकारी, छत्रपती संभाजी नगर व त्यांच्या अधिनस्त असलेल्या सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी तथा जन माहिती अधिकारी, छत्रपती संभाजी नगर यांना असे निर्देश देण्यात येतात की, दि.२२.०६.२०२२ रोजी जन माहिती अधिकारी, अन्न व नागरी पुरवठा कार्यालय यांनी हस्तांतरीत केलेल्या **जोडपत्र अ** वरील त्यांचे कार्यासनात उपलब्ध असलेली, **कलम २ (च)** प्रमाणे देय असलेली माहिती अपिलार्थींना **विनामूल्य** प्रदान करण्याच्या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपिल अर्ज निकाली काढून नस्तीबध्द करण्यात येत आहे.

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**

**२. अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

**( राहुल भा.पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : ०३-१२-२०२५**

State Information Commission
Maharashtra